॥ आजचा सुविचार ॥
सामान्य दिसणारे लोकच
जगात सर्वात चांगले लोक असतात.
म्हणूनच देव अश्या
लोकांनाच जास्ती निर्माण करतो.

दैनिक
अचूक वेध, अचूक बातमी
# अक्षराज
संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध
Email : newsaksharaj2021@gmail.com

खालील (क्यू आर कोड) स्कॅन करा...
आणि अक्षराज मीडियाच्या व्हाट्सअप चॅनल ला
फॉलो करा व मिळवा सर्व घडामोडींचे अपडेट्स
एकाच वेळी एकाच ठिकाणी...
कृपया इथे स्कॅन करा
Plz Scan Here

वर्ष : ०६ | अंक : ५०, पाने : ०४, किंमत : ०३ रुपये | बुलडाणा, शनिवार, दि.०३ ऑक्टोबर २०२६ | संपादक : विनोद कैलास गोरे | RNI NO. : MAHMAR/2022/82056

# मुंबईत सीजेपीच्या आंदोलनस्थळी गोंधळ !
## अचानक आलेल्या ग्रुपकडून जय श्रीरामच्या घोषणा



**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.०२, मुंबई :** कॉक्रोच जनता पार्टीकडून आज अभिजीत दिपके यांच्या नेतृत्वात मुंबईतील छत्रपती शिवाजी महाराज पार्क इथं आंदोलन केलं जात आहे. या आंदोलनाला तरुणाईचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला असून आंदोलनातून केंद्रीय निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या राजीनाम्याची मागणी केली जात आहे. दुपारपासून सुरू असलेल्या या आंदोलनात सायंकाळच्या सुमारास काहीसा गोंधळ उडाला. १५ ते २० तरुणांचा एक गट अचानक आंदोलनस्थळी दाखल झाला आणि त्यांच्याकडून 'जय श्रीराम'च्या घोषणा देण्यात आल्या. त्यानंतर पोलिसांनी अनुचित प्रकार टाळण्यासाठी वेळीच मध्यस्थी करत घोषणाबाजी करणाऱ्या गटाला आंदोलनस्थळापासून दूर नेलं.

अभिजीत दिपके यांनी आंदोलनस्थळी केलेल्या भाषणातून पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघावर जोरदार टीका केली. आज आपण सर्वजण इतक्या मोठ्या संख्येने इथं उपस्थित राहिलात. महात्मा गांधीजींना यापेक्षा मोठी श्रद्धांजली असू शकत नाही. इथं उपस्थित असलेला प्रत्येकजण गांधी आहे.

संघाच्या लोकांनी जितका त्रास महात्मा गांधींना दिला नव्हता, त्यापेक्षाही अधिक त्रास आपल्याला दिला जात आहे. पण गांधी मरत नाहीत. गांधी हे या देशाचा आत्मा आहेत. गोडसेसारखे हजारो येतील आणि हजारो जातील. पण हा देश गांधींच्याच मार्गाने चालणार आहे. त्यांच्या विचारानेच हा देश टिकला आहे. गोडसेच्या विचारांच्या लोकांना आम्ही सांगू इच्छितो की, तुम्ही गांधींना कधीही संपवू शकत नाही. एक महामानव येतो आणि म्हणतो मी नॉन बायोलॉजिकल आहे, आम्हालाही कळतंय की तुम्ही मनुष्य असूच शकत नाही. ते स्वत:ला गांधी आणि नेहरुंपेक्षा मोठं करू पाहतायत, पण ते या जन्मात काय पुढील सात जन्मातही शक्य नाही. गांधी, नेहरू आणि आंबेडकर यांची बरोबरी करण्याची तुमची पात्रता नाही. गांधीजी या देशाचा आत्मा आहेत, तर डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे या देशाचा कणा आहेत. जवाहरलाल नेहरू हे या देशाचे मन आहेत, अशा शब्दांत दिपके यांनी सरकारचा समाचार घेतला.

दरम्यान, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना फक्त जनतेला लुटायला येतं, त्यांच्याकडे देशाला देण्यासाठी काही नाही. नोटबंदी करून त्यांनी जनतेला रांगा लावायला लावल्या, कोरोनामध्ये लस घेण्यासाठी रांगा लावायला लावल्या आणि आता मतदारयादीत नाव येण्यासाठीही रांग लावायला लावत आहेत, अशी टीकाही अभिजीत दिपके यांनी केली आहे.

## दुर्गादेवीची मूर्ती आणायला गेलेल्या तरुणांवर काळाची झडप, समृद्धी महामार्गावर भीषण अपघात
# ६ जणांचा जागीच मृत्यू !



**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.०२, अमरावती :** नवरात्रौत्सवासाठी दुर्गादेवीची मूर्ती आणण्यासाठी शेगावला गेलेल्या तरुणांवर परतीच्या प्रवासात काळानं झडप घातली. अमरावती जिल्ह्यातील धामणगाव रेल्वे स्टेशनजवळ समृद्धी महामार्गावर बोलेरो पिकअपला कंटेनरनं मागून दिलेल्या भीषण धडकेत पाच जणांचा मृत्यू झाल्याची प्राथमिक माहिती आहे. या दुर्घटनेत १२ जण गंभीर जखमी असून ६ जण किरकोळ जखमी झाले आहेत. मध्यरात्री एकच्या सुमारास महामार्गावरील चॅनल क्रमांक ९७ जवळ हा अपघात झाला. या घटनेमुळे वर्धा जिल्ह्यातील सिंदी मेघे परिसरावर शोककळा पसरली आहे.

**तरुणांचा प्रवास काळरात्र ठरला !**

वर्धा शहरालगतच्या सावंगी मेघे येथील सोमनाथी लेआउट परिसरातील नवदुर्गा पूजा उत्सव समितीचे सदस्य दरवर्षी नवरात्रौत्सवासाठी शेगाव येथून दुर्गादेवीची मूर्ती आणतात. यंदाही मंडळाचे तरुण सदस्य दुर्गादेवीची उंच मूर्ती आणण्यासाठी शेगावला गेले होते. देवीची मूर्ती घेऊन बोलेरो पिकअप वाहनातून ते वर्ध्याच्या दिशेने परतत होते. नवरात्रौत्सवाची तयारी आणि उत्साह घेऊन परतणाऱ्या या तरुणांचा प्रवास मात्र धामणगावजवळ अचानक काळरात्र ठरला.

**मृतांचा आकडा वाढण्याची शक्यता !**

समृद्धी महामार्गावर चॅनल क्रमांक ९७ जवळ बोलेरो पिकअप वाहन जात असताना मागून आलेल्या भरधाव कंटेनरने त्याला जोरदार धडक दिली. धडक इतकी भीषण होती की पिकअप वाहनाचं मोठं नुकसान झालं. वाहनातील तसेच देवीच्या मूर्तीसोबत प्रवास करणारे मंडळाचे सदस्य या अपघातात गंभीररीत्या जखमी झाले. काही जणांना वाहनाच्या धडकेत गंभीर दुखापत झाली. अपघातानंतर महामार्गावर एकच गोंधळ उडाला. घटनेची माहिती मिळताच धामणगाव पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. स्थानिकांच्या मदतीने जखमींना वाहनातून बाहेर काढण्यात आले. त्यांना तातडीने धामणगाव ग्रामीण रुग्णालयात हलविण्यात आले. गंभीर जखमींना पुढील उपचारासाठी वर्धा येथील सावंगी रुग्णालयात दाखल करण्यात आल्याची माहिती आहे. जखमींपैकी काहींची प्रकृती गंभीर असल्याने मृतांचा आकडा वाढण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

**सिंदी मेघे परिसरात हळहळ :** या दुर्घटनेत घनश्याम पाटील, ओम गावंडे, सचिन बादमनवार, प्रवीण बकाने आणि दत्ता कुळसंगे या पाच जणांचा मृत्यू झाल्याची प्राथमिक माहिती आहे. मृतांपैकी बहुतांश जण नवदुर्गा पूजा उत्सव समिती, सोमनाथी लेआउट, सावंगी मेघे, वर्धा येथील सदस्य असल्याचे सांगण्यात येत आहे. आपल्या मंडळासाठी देवीची मूर्ती आणण्यासाठी गेलेल्या तरुणांचा अशा पद्धतीने दुर्दैवी अंत झाल्याने सिंदी मेघे परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे.

**काळीज पिळवटून टाकणारा प्रसंग :** दरम्यान, अपघाताची माहिती मिळताच धामणगावच्या नगराध्यक्ष अर्चना रोठे, अमरावती जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक निकेतन कदम आणि विशेष पोलीस महानिरीक्षक महेश पाटील यांनी घटनास्थळी तसेच रुग्णालयात भेट देऊन परिस्थितीची पाहणी केली. जखमींच्या उपचाराबाबतही माहिती घेण्यात आली. अपघात नेमका कोणत्या कारणामुळे झाला, कंटेनरचा वेग किती होता, पिकअप वाहनात किती जण प्रवास करत होते आणि अपघाताच्या वेळी कोणत्या परिस्थितीत ही वाहने होती, याचा तपास धामणगाव पोलीस करीत आहेत. अपघातातील वाहनांचीही तपासणी केली जात आहे. नवरात्रौत्सवाच्या काही दिवस आधी देवीची मूर्ती आणण्यासाठी गेलेल्या तरुणांवर आलेल्या या संकटामुळे उत्सवाच्या आनंदावर दुःखाचे सावट पसरले आहे. देवीच्या आगमनाची तयारी करण्यासाठी गेलेल्या तरुणांचा परतीचा प्रवास त्यांच्या कुटुंबीयांसाठी आणि संपूर्ण परिसरासाठी काळीज पिळवटून टाकणारा ठरला आहे.

# विनर्स अकादमीच्या मिळकतीवर आळंदी नगरपरिषदेची कारवाई; अकादमी सील




**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.०२, आळंदी (पुणे) :** दिवेआगर येथे आळंदीहून सहलीसाठी गेलेल्या आठ विद्यार्थ्यांचा झालेल्या दुर्दैवी मृत्यूच्या पार्श्वभूमीवर आळंदी नगरपरिषदेमार्फत शहरातील संबंधित कोचिंग क्लासेस व आस्थापनांची पाहणी करण्यात येत आहे.

या अनुषंगाने आळंदी नगरपरिषदेच्या पथकाने विनर्स अकादमीच्या इमारतीची प्रत्यक्ष पाहणी केली. पाहणीदरम्यान नारायण हरिभाऊ दस यांच्या मालकीची मालमत्ता क्र. जुना ११३७, नवीन LAN00001729 या मिळकतीमध्ये विनर्स अकादमी कोचिंग क्लासेस सुरू असल्याचे निदर्शनास आले.

सदर आस्थापनेने नगरपरिषदेकडून आवश्यक व्यवसाय परवाना/ना-हरकत प्रमाणपत्र घेतल्याचे नगरपरिषदेच्या अभिलेखावरून निदर्शनास आले नाही. त्यामुळे लागू असलेल्या कायदे व नियमांनुसार आवश्यक कार्यवाही करण्याचे निर्देश देण्यात आले.

त्यानुसार मुख्याधिकारी माधव खांडेकर यांच्या आदेशानुसार कर विभाग प्रमुख श्रीमती सीमा चारवे यांच्या नेतृत्वाखाली नगरपरिषदेच्या पथकाने विनर्स अकादमीची सदर मिळकत सील करण्याची कार्यवाही केली. या कार्यवाहीदरम्यान पोलीस प्रशासनाचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

सदर कार्यवाही ही संबंधित आस्थापनांनी आवश्यक परवानग्या व नियमांचे पालन करावे तसेच नगरपरिषदेकडून लागू असलेल्या कायदेशीर तरतुदींची प्रभावी अंमलबजावणी सुनिश्चित करण्याच्या अनुषंगाने करण्यात आली आहे.

# नवी मुंबईतील १७ रेल्वे स्थानकांवरील कामगारांना दिलासा



**अक्षराज : जे. के. पोळ**

**दि.०२, नवी मुंबई :** नवी मुंबई व परिसरातील रेल्वे स्थानकांचे सिडकोकडून रेल्वे प्रशासनाकडे हस्तांतरण झाल्यानंतर या स्थानकांवर वर्षानुवर्षे कार्यरत असलेल्या कामगारांच्या रोजगाराचा प्रश्न निर्माण झाला होता. या पार्श्वभूमीवर ठाणे लोकसभेचे खासदार नरेश म्हस्के यांच्या पुढाकाराने छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस येथे विभागीय रेल्वे व्यवस्थापक (ठच्) हिरेश मीना यांच्यासोबत बैठक झाली. पात्र व प्रत्यक्ष कार्यरत असलेल्या कोणत्याही कामगाराला वंचित ठेवले जाणार नाही, असे आश्वासन या बैठकीत देण्यात आले.

यावेळी नवी मुंबई शिवसेना जिल्हाप्रमुख द्वारकानाथ भोईर, नवी मुंबई महानगरपालिका नगरसेवक तथा युवासेना नवी मुंबई जिल्हाप्रमुख अनिकेत रमाकांत म्हात्रे, आगरी सेनेचे नवी मुंबई प्रमुख (जिल्हाध्यक्ष) व महाराष्ट्र प्रदेश कार्यकारिणी सदस्य दिनेश गजानन म्हात्रे, लुकेश सदानंद म्हात्रे, राहुल दुबे, समाजसेवक भावेश पाटील यांच्यासह संबंधित कामगार उपस्थित होते.

मे महिन्यात खासदार म्हस्के यांच्या माध्यमातून रेल्वे व सिडको अधिकाऱ्यांची संयुक्त समन्वय बैठक झाली होती. त्यावेळी नवी मुंबई हद्दीतील १३ आणि रायगड हद्दीतील ३, अशा एकूण १७ रेल्वे स्थानकांच्या हस्तांतरणाचा विषय चर्चेत आला होता. सिडको व रेल्वे यांच्यातील संबंधित करार २००८ मध्ये संपल्यानंतरही सिडकोकडून रेल्वे परिसराची तात्पुरती देखभाल सुरू होती. त्यानंतर खासदार म्हस्के यांच्या पाठपुराव्याने हस्तांतरणाची प्रक्रिया पूर्ण झाली.

या स्थानकांच्या देखभाल व इतर कामांसाठी सिडकोच्या कंत्राटदारांमार्फत सुमारे ३२३ कामगार कार्यरत असल्याचे नमूद करण्यात आले होते. त्यापैकी काही कामगार अनेक वर्षांपासून, तर काहीजण जवळपास ३० वर्षांपासून प्रत्यक्ष सेवा बजावत असल्याचे बैठकीत सांगण्यात आले. त्यामुळे आगामी कंत्राट प्रक्रियेत अशा कामगारांचा नियमानुसार विचार करावा, अशी मागणी खासदार म्हस्के यांनी केली.

कामगारांच्या संख्येबाबतही बैठकीत चर्चा झाली. काही ठिकाणी प्रत्यक्ष काम करणाऱ्या कामगारांपेक्षा अधिक नावे दाखवून संख्या वाढविण्यात आल्याचा मुद्दा उपस्थित करण्यात आला. त्यामुळे उपलब्ध नोंदी, कामाचा कालावधी, उपस्थिती आणि प्रत्यक्ष सेवा यांची शहानिशा करून वास्तविक पात्र कामगारांवर अन्याय होऊ नये, अशी सूचना म्हस्के यांनी केली.

प्रत्यक्ष कामाचा पुरावा नसलेल्या किंवा अधिकृत नोंदी व पात्रतेत न बसणाऱ्या व्यक्तींचा समावेश केला जाणार नाही, असे ठच् हिरेश मीना यांनी स्पष्ट केले. पडताळणीत पात्र ठरणाऱ्या आणि प्रत्यक्ष सेवा बजावणाऱ्या कामगारांचाच नियमानुसार विचार केला जाईल, असेही त्यांनी सांगितले.

खऱ्या कामगाराचा हक्क हिरावला जाऊ नये आणि प्रत्यक्ष काम न करणाऱ्या व्यक्तींना प्रक्रियेचा गैरफायदा घेता येऊ नये. संपूर्ण प्रक्रिया पारदर्शक व पडताळणीवर आधारित असावी, अशी भूमिका खासदार नरेश म्हस्के यांनी मांडली.

रेल्वे प्रशासनाच्या आश्वासनामुळे उपस्थित कामगारांना दिलासा मिळाला. रोजगाराच्या प्रश्नावर पाठपुरावा केल्याबद्दल दिनेश गजानन म्हात्रे, लुकेश सदानंद म्हात्रे, राहुल दुबे तसेच कामगारांनी खासदार नरेश म्हस्के यांचे आभार मानले.

# शिरपूर तालुक्यात पोलिसांची कारवाई; ९ जणांवर हद्दपारीची कारवाई

**अक्षराज : नंदकुमार बोरसे**

**दि.०२, शिरपूर (धुळे) :** शिरपूर शहर व तालुक्यातील कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवण्याच्या दृष्टीने पोलिस प्रशासनाने प्रतिबंधात्मक कारवाईचा धडाका सुरू केला आहे. मुंबई पोलीस कायद्यानुसार शिरपूर परिसरातील एकूण ९ व्यक्तींवर हद्दपारीची कारवाई करण्यात आली आहे.

उपलब्ध आदेशानुसार, मुंबई पोलीस कायदा कलम ५६ अन्वये भाईदास आकाश मोरे (वय २९, रा. आमोदा, ता. शिरपूर), कृष्णा जामसिंग पारधी (वय ३२, रा. उंटावद, ता. शिरपूर), अनिल जामसिंग पारधी (वय २९, रा. उंटावद, ता. शिरपूर) आणि शुभम शरद माळी (वय २८, रा. चंद्रसेठची चाळ, भंडारी टॉकीजजवळ, शिरपूर) यांना एक वर्षासाठी हद्दपार करण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

या आदेशानुसार संबंधित व्यक्तींना धुळे जिल्ह्यासह नंदुरबार जिल्ह्यातील नवापूर, नंदुरबार व शहादा तालुका, जळगाव जिल्ह्यातील चाळीसगाव, भडगाव, पाचोरा, अमळनेर व चोपडा तालुका तसेच नाशिक जिल्ह्यातील मालेगाव व बागलाण तालुक्यांच्या हद्दीतून बाहेर राहण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

दरम्यान, मुंबई पोलीस कायदा कलम ५५ अन्वये रवि उर्फ रविंद्र आधार सोनवणे (वय ४१, रा. क्रांतीनगर, शिरपूर), सनी धुडकु सोनवणे (वय २९, रा. मच्छी बाजार, शिरपूर), ऋषिकेश धुडकु सोनवणे (वय ३२, रा. मच्छी बाजार, शिरपूर), भरत नाना सोनवणे (वय ३४, रा. मच्छी बाजार, शिरपूर) आणि गोकुळ सुभाष (सुहास) सोनवणे (वय ४१, रा. मच्छी बाजार, शिरपूर) या पाच जणांना सहा महिन्यांसाठी धुळे जिल्ह्यातून हद्दपार करण्यात आले आहे. सदर हद्दपारीचा आदेश दि. १९ सप्टेंबर २०२६ पासून लागू करण्यात आल्याचे आदेशपत्रात नमूद आहे.

पोलिस प्रशासनाच्या या कारवाईमुळे गुन्हेगारी प्रवृत्तींना आळा बसविण्यासह शहर व तालुक्यातील कायदा व सुव्यवस्था अधिक मजबूत करण्याच्या दृष्टीने पोलिसांनी प्रतिबंधात्मक पावले उचलल्याचे दिसून येत आहे.

अक्षराज






## नागपुरात जाळला 'नागपूर करार'

करार नागपुरात झाला म्हणून त्याला 'नागपूर करार' म्हणायचे. तसा तर तो केला गेला संयुक्त महाराष्ट्राच्या निर्मितीसाठीच. विदर्भ, मराठवाडा आणि पश्चिम महाराष्ट्रातील दिग्गज नेत्यांनी २८ सप्टेंबर १९५३ रोजी तो तयार केला होता. बरोबर ७३ वर्षांनी म्हणजे २८ सप्टेंबर २०२६ रोजी नागपुरात विदर्भवाद्यांनी त्या कराराची होळी केली. 'नागपूर करार' ज्या वेळी झाला, तो काळ होता देशातील राज्यांची पुनर्घटना आणि पुनर्रचना करण्याचा. मराठीभाषक जनता वेगवेगळ्या मुलुखांत विखुरलेली होती. आठ जिल्ह्यांचा मराठीभाषक विदर्भ मध्य प्रांतात होता. त्यांना हिंदीभाषी मध्य प्रांतापासून वेगळे होऊन वेगळे राज्य व्हायचे होते. मराठवाडा हैदराबाद राज्यात घुसमटत होता. मुंबई राज्यातील मराठीभाषक भाग, विदर्भ आणि मराठवाड्यातील मराठीभाषक सलग भाग एकत्र यावा आणि एक राज्य व्हावे असा मतप्रवाह त्या वेळी मोठ्या प्रमाणात होता. सगळ्या मराठीभाषकांचे एक राज्य झाले तर मुंबई-पुण्याच्या नेत्यांचा वरचष्मा असेल. विदर्भ, मराठवाडा मागे पडेल ही शक्यता, भीती व्यक्त केली जात होती. त्यामुळे संयुक्त महाराष्ट्रात सहभागी होताना काही तरी ठरवून घेणे, अटी-शर्ती घालणे गरजेचे होते. त्या वेळी अटींनी घेतलेला आकार म्हणजेच 'नागपूर करार'.

लोकसंख्येच्या प्रमाणात मंत्रिमंडळात प्रतिनिधित्व, शिक्षणाच्या सोयी, नोकरीत प्रतिनिधित्व, न्यायकारभारात प्रतिनिधित्व, निधी वाटप, मराठवाड्याची मागासलेली परिस्थिती लक्षात घेता सर्वांगीण उन्नत्तीसाठी खास तरतूद करणे, वर्षातून विशिष्ट कालावधीसाठी सरकार नागपुरात हलविणे, कायदेमंडळाचे एकतरी अधिवेशन दरवर्षी नागपुरात घेणे अशा कलमांचा या करारात समावेश होता.

आज 'नागपूर करार' फक्त बोलण्यापुरता मर्यादित झाला असेल; पण तो झाला त्यावेळी त्याचे काय महत्त्व होते, हे तेव्हाच्या पश्चिम महाराष्ट्राच्या नेत्यांच्या प्रतिक्रियांतून कळावे. प्रदेश काँग्रेसच्या बैठकीत जाहीरपणे बोलताना काकासाहेब गाडगीळ म्हणाले होते, 'संयुक्त महाराष्ट्राबाबत नागपूर येथे झालेल्या कराराइतकी विधायक गोष्ट महाराष्ट्रात गेल्या दीडशे वर्षांत घडलेली नाही. लोकमान्य टिळकांनी लखनौ करार केला, तेच चातुर्य व दूरदृष्टी नागपूर करारात आहे.' महाराष्ट्रातील तेव्हाचे मोठे नेते शंकरराव देव यांनी नागपुरातील ज्येष्ठ संपादक ग. त्र्यं. माडखोलकरांना लिहिले होते, 'नागपूर करार होऊन त्यावर डॉ. गोपाळराव खेडकरांची सही झाली, तेव्हाच मी मंडळींना लिहिले होते की, विदर्भ प्रदेश कमिटी हे संयुक्त महाराष्ट्राचे कुरुक्षेत्र ठरणार. विदर्भ प्रांतिक कमिटीचा नागपूर कराराला मान्यता देणारा ठराव झाला म्हणजे संयुक्त महाराष्ट्राची अर्धी लढाई आपण जिंकली असे मला वाटते.'

पुढे द्वैभाषिकाची निर्मिती झाली. विदर्भ राजधानीपद सोडून मराठी मुंबईच्या सोबतीला गेला. मराठवाडा वेगळे करारमदार न करता सोबत आला. 'नागपूर करारा'वरील विश्वास ही त्यामागची प्रेरणा होती. प्रसिद्ध संशोधक य. दि. फडके निरीक्षण नोंदवितात की, '१९६०च्या सुरुवातीस शासनाने 'गायडिंग प्रिन्सिपल्स ऑफ महाराष्ट्र स्टेट्स' ही पुस्तिका प्रकाशित केली. त्यात नागपूर करारातील बहुतेक सर्वच तरतुदीचा समावेश होता.' यशवंतराव चव्हाणांनी तर स्पष्टपणे सांगितले होते, की 'विदर्भ आणि मराठवाड्याला नागपूर करारापेक्षा अधिक मदत केली जाईल.' या कराराला वैधानिक महत्त्व नसल्याचे मुद्दे उपस्थित झाले, तेव्हा ३७१(२) कलमान्वये ते अधोरेखित केले गेले. असमतोल निधीवाटपाची, अनुशेषाची चर्चा रंगल्यानंतर वैधानिक विकास मंडळे आली. समन्यायी वाटपाचे सूत्र आले. राज्यपालांवर जबाबदारी आली. हे सगळे घडवून आणण्यामागे काही ना काही प्रमाणात 'नागपूर करार' होताच.

**– अतुल पांडे**

# पितृपक्ष आणि श्राद्धकर्म!

सध्या पितृ पंधरवडा सुरु आहे. आपले जवळचे नातेवाईक ज्या तिथीला निर्वर्तले असतील,पितृपक्षातील त्या तिथीला त्यांच्यासाठी घास ठेवण्याचा प्रघात मागील हजारो वर्षांपासून चालत आला आहे. 'पितृपक्ष', 'श्राद्ध' म्हटले की, हल्लीच्या विज्ञानयुगातील तरुण पिढीच्या मनात 'अशास्त्रीय आणि अवास्तव कर्मकांडाचे अवडंबर', अशी त्याविषयीची चुकीची प्रतिमा उभी रहाते.



धर्मशिक्षणाचा अभाव, अध्यात्म समजून घेण्याविषयीची अनास्था, पाश्चात्त्य संस्कृतीचा प्रभाव, धर्मद्रोही संघटनांकडून हिंदु धर्मातील प्रथा-परंपरा यांवर सातत्याने होणारी द्वेषमूलक टीका इत्यादींचा हा परिणाम आहे. शाद्धाविषयी पुढीलसारखी विचारसरणीही समाजात आढळून येते. पूजाअर्चा, शाद्धपक्ष यांवर विश्वास न ठेवणारे किंवा समाजकार्यच सर्वश्रेष्ठ आहे, असे म्हणणारे, 'पितरांसाठी शाद्धविधी न करता त्याऐवजी गरिबांना अन्नदान करू किंवा शाळेला मदत करू', असे म्हणतात ! त्याप्रमाणे कित्येक जण करतातही ! असे करणे म्हणजे, 'एखाद्या रोग्यावर शस्त्रक्रिया न करता त्याऐवजी आम्ही गरिबांना अन्नदान करू, शाळेला मदत करू', असे म्हणण्यासारखे आहे.

श्राद्धातील मंत्रोच्चारांमध्ये पितरांना गती देण्याची सूक्ष्म शक्ती सामावलेली असल्याने शाद्धविधीतून पितरांना गती मिळणे शक्य होते; म्हणून वरील विधाने हास्यास्पद ठरतात. हिंदु धर्माने सांगितलेल्या ईश्वरप्राप्तीच्या मूलभूत सिद्धांतांपैकी एक म्हणजे 'देवऋण, ऋषीऋण, पितृऋण आणि समाजऋण ही चार ऋणे फेडणे' होय. यांपैकी पितृऋण फेडण्यासाठी पितरासाठी शाद्धविधी करणे आवश्यक असते. भारतीय संस्कृती असे सांगते की, ज्याप्रमाणे माता-पिता, तसेच निकटवर्तीय हयात असतांना त्यांची सेवाशुश्रूषा आपण धर्मपालन म्हणून करतो, त्याप्रमाणे त्यांच्या मृत्यूनंतरही त्यांच्याप्रती आपले काहीतरी कर्तव्य असते. त्या कर्तव्यपूर्तीची आणि त्याद्वारे पितरऋण फेडण्याची सुसंधी शाद्धकर्मामुळे मिळते. लहानपणी तळहातावरील फोडाप्रमाणे आपल्याला जपणार्या आपल्या मातापित्यांचा मृत्योत्तर प्रवास हा सुखमय आणि क्लेशरहित व्हावा, त्यांना सद्गती मिळावी यासाठी शाद्धविधी आवश्यक असतो. शाद्ध न केल्यास पितरांच्या इच्छा अतृप्त राहिल्यामुळे, तसेच असे वासनायुक्त पितर कुटुंबियांना त्रास देण्याची शक्यता अधिक असते. शाद्धविधीमुळे पितरांची या त्रासांतून मुक्तता होऊन आपले जीवनही सुसह्य होते. विशिष्ट वार, तिथी आणि नक्षत्र यांना श्राद्ध केल्याने पितृकर्म होण्याबरोबरच विशिष्ट फलप्राप्तीही होते.

**श्राद्धासंबंधी प्राचीन ग्रंथांतील संदर्भ**

हिंदु धर्मामध्ये मृत पितरांना पुढची गती मिळावी, यासाठी श्राद्धविधी करण्यास सांगितला आहे. श्राद्ध न केल्यास कोणते दोष संभावतात, याचेही वर्णन विविध धर्मग्रंथांत आले आहे.

**१. ऋग्वेद**

**त्वमग्न ईळितो जातवेदोऽ**
**वाड्ढव्यानि सुरभीणि कृत्वी ।**
**प्रादाः पितृभ्यः स्वधया ते अक्षन्नद्धि**
**त्वं देव प्रयता हवींषि ।।** – ऋग्वेद, मण्डल १०, सूक्त १५, ऋचा १२

**अर्थ :** हे सर्वज्ञ अग्निदेवा, आम्ही तुझी स्तुती करतो. तू आम्ही दिलेले हे हवनीय द्रव्य सुगंधित करून आमच्या पितरांना पोहोचव. आमचे पितर स्वधा म्हणून दिलेल्या हवनीय द्रव्याचे भक्षण करोत. हे देवा, तूसुद्धा आम्ही प्रयत्नपूर्वक अर्पण केलेल्या या हविर्भागाचे भक्षण कर.

**२. कूर्मपुराण**

**अमावास्यादिने प्राप्ते गृहद्वारं समाश्रिताः ।**
**वायुभूताः प्रपश्यन्ति श्राद्धं वै पितरो नृणाम् ।।**
**यावदस्तमयं भानोः क्षुत्पिपासासमाकुलाः ।**
**ततश्चास्तङ्गते भानौ निराशादुःखसंयुताः ।।**
**निःश्वस्य सुचिरं यान्ति गर्हयन्तः स्ववंशजम्।**
**जलेनाऽपि च न श्राद्धं शाकेनापि करोति यः ।।**
**अमायां पितरस्तस्य शापं दत्वा प्रयान्ति च ।।**
– कूर्मपुराण

**अर्थ :** (मृत होऊन) वायूरूप झालेले पितर अमावास्येच्या दिवशी आपल्या वंशजांच्या घरी येऊन आपल्याला श्राद्ध वाढले जात आहे का, हे पहातात. सूर्य मावळेपर्यंत तहान-भुकेने (अतृप्त वासनांमुळे) व्याकुळ झालेले पितर श्राद्ध न मिळाल्याने सूर्यास्त झाल्यावर निराश होतात आणि दुःखी निःश्वास टाकून स्वतःच्या वंशजांना चिरकाल दोष देतात. अशा वेळी जो पाण्याने अथवा भाजीनेही श्राद्ध वाढत नाही, त्याला अमावास्येच्या दिवशी त्याचे पितर शाप देऊन निघून जातात.

**३. आदित्यपुराण**

**न सन्ति पितरश्चेति कृत्वा मनसि वर्तते ।**
**श्राद्धं न कुरुते यस्तु तस्य रक्तं पिबन्ति ते ।।**
– आदित्यपुराण

**अर्थ :** मेल्यावर पितरांचे अस्तित्व नसते, असा विचार करून जो श्राद्ध करत नाही, त्याचे रक्त त्याचे पितर पितात.

**(संदर्भ :** सनातन संस्थेचे संकेतस्थळ : सनातन डॉट ओआरजी)

**– जगन घाणेकर, घाटकोपर, मुंबई**
**संपर्क क्रमांक : ९६६४५५९७८०**

# युनायटेड किंगडमच्या ऐक्याला आव्हान : ब्रिटिश साम्राज्यापासून अंतर्गत स्वायत्ततेपर्यंत

एक काळ असा होता की, ब्रिटिश साम्राज्यावर सूर्य कधीच मावळत नाही असे अभिमानाने म्हटले जात असे. आशिया, आफ्रिका, अमेरिका, ऑस्ट्रेलिया आणि इतर अनेक प्रदेशांमध्ये ब्रिटिश सत्तेचा प्रभाव पसरला होता. भारतासह अनेक देशांवर ब्रिटिश साम्राज्याने दीर्घकाळ राज्य केले. मात्र, इतिहासाचे चक्र कायम एकाच दिशेने फिरत नाही. विसाव्या शतकात वसाहतवादाचा अंत झाला आणि ब्रिटिश साम्राज्याचे स्वरूप झपाट्याने बदलले. आज ब्रिटनसमोर बाहेरील साम्राज्य टिकवण्याचे नव्हे, तर स्वतःच्या संघराज्यीय रचनेतील ऐक्य टिकवण्याचे आव्हान उभे आहे.

**स्वातंत्र्याच्या मागण्यांना पुन्हा जोर**

युनायटेड किंगडममध्ये स्कॉटलंड, वेल्स आणि उत्तर आयर्लंड या घटकांना विविध पातळ्यांवर स्वायत्त अधिकार आहेत. मात्र, गेल्या काही वर्षांत विशेषतः स्कॉटलंडमध्ये पूर्ण स्वातंत्र्याची मागणी सातत्याने चर्चेत आहे. वेल्समध्येही अधिक स्वायत्ततेचा आणि घटनात्मक अधिकारांचा प्रश्न पुढे आला आहे. उत्तर आयर्लंडमध्ये मात्र प्रश्नाचा संदर्भ वेगळा असून तो आयर्लंडच्या पुनर्एकीकरणाशी संबंधित आहे.

सप्टेंबर २०२६ मध्ये स्कॉटलंड, वेल्स आणि उत्तर आयर्लंडशी संबंधित प्रमुख राजकीय नेत्यांनी घटनात्मक भवितव्य आणि स्वतंत्रतेच्या प्रश्नावर परस्पर सहकार्य करण्यासाठी करार केला. ही बैठक संबंधित नेत्यांनी त्यांच्या पक्षीय भूमिकेतून घेतली होती; त्यामुळे त्याला तिन्ही घटक देशांनी अधिकृतपणे स्वातंत्र्य घोषित केल्याचा अर्थ लावणे योग्य ठरणार नाही.

Brexit नंतर असंतोषाला नवी धार

ब्रिटनने २०२० मध्ये युरोपियन युनियनमधून बाहेर पडण्याची प्रक्रिया पूर्ण केली. Brexit नंतर केंद्र आणि घटक राष्ट्रांमधील संबंध, आर्थिक धोरणे आणि राजकीय अधिकार यावर नव्याने चर्चा सुरू झाली. विशेषतः स्कॉटलंडमध्ये युरोपियन युनियनमध्ये राहण्याच्या भूमिकेला महत्त्व होते. त्यामुळे Brexit च्या पार्श्वभूमीवर स्वातंत्र्याच्या मागणीला नवी राजकीय धार मिळाल्याचे दिसते.

तथापि, घटक राष्ट्रांना केंद्राकडून निधी मिळत नाही, असे चित्र पूर्णपणे अचूक नाही. Barnett Formula अंतर्गत स्कॉटलंड, वेल्स आणि उत्तर आयर्लंडच्या विकेंद्रित सरकारांना निधी दिला जातो. याशिवाय काही कर व खर्चाचे अधिकारही या प्रशासनांकडे सोपवण्यात आले आहेत. २०२६ च्या ब्रिटिश सरकारच्या Spending Review मध्येही या तिन्ही प्रशासनांसाठी मोठ्या प्रमाणात अतिरिक्त निधीची तरतूद करण्यात आली आहे.

म्हणूनच या प्रश्नाकडे केवळ केंद्र पैसा देत नाही या दृष्टिकोनातून न पाहता आर्थिक अधिकार, करसंकलन, संसाधनांचे वाटप, स्थानिक निर्णयक्षमता आणि राजकीय प्रतिनिधित्व या सर्व मुद्द्यांच्या संदर्भात पाहणे आवश्यक आहे.

**ऐतिहासिक संघर्षाची पार्श्वभूमी**

स्कॉटलंड आणि इंग्लंड यांच्यातील राजकीय एकीकरण १७०७ च्या Acts of Union नंतर झाले. वेल्सचे इंग्लंडशी राजकीय एकत्रीकरण त्यापूर्वीच झाले होते. उत्तर आयर्लंडचा प्रश्न मात्र अधिक गुंतागुंतीचा आहे. आयर्लंडच्या विभाजनानंतर १९२१-२२ पासून उत्तर आयर्लंड युनायटेड किंगडमचा भाग राहिले.

आयर्लंडच्या स्वातंत्र्याच्या संघर्षाला हिंसक वळणही मिळाले. १९७९ मध्ये ब्रिटिश राजघराण्यातील सदस्य आणि भारताचे शेवटचे व्हाइसरॉय लॉर्ड लुईस माउंटबॅटन यांची आयर्लंडमध्ये झालेल्या बॉम्बस्फोटात हत्या करण्यात आली. या हल्ल्याची जबाबदारी Provisional IRA ने स्वीकारली होती. त्यामुळे या घटनेचा उल्लेख करताना आयरिश बंडखोर एवढ्या व्यापक शब्दाऐवजी संबंधित संघटनेचा संदर्भ देणे अधिक अचूक ठरते.

**ब्रिटिश अर्थव्यवस्थेचे बदलते चित्र !**

ब्रिटन आजही जगातील महत्त्वाच्या अर्थव्यवस्थांपैकी एक आहे. त्यामुळे ब्रिटिश अर्थव्यवस्था कमकुवत झाली असे सरसकट म्हणण्याऐवजी, तिच्यासमोर आर्थिक वाढ, महागाई, सार्वजनिक वित्त आणि उत्पादकतेशी संबंधित आव्हाने आहेत, असे म्हणणे अधिक योग्य ठरेल. खचत्र्ऋ्या २०२६ च्या अंदाजानुसार ब्रिटनच्या अर्थव्यवस्थेची वाढ २०२६ मध्ये सुमारे १ टक्के राहण्याचा अंदाज आहे. त्याच वेळी भारताच्या २०२६ मधील वास्तविक GDP वाढीचा IMF चा अंदाज ६.४ टक्के आहे. मात्र, या वाढीच्या दरांची तुलना करताना दोन्ही देशांच्या अर्थव्यवस्थेचा आकार, लोकसंख्या आणि विकासाची पातळी वेगळी आहे हे लक्षात घेणे आवश्यक आहे.

**ऐक्य टिकवण्याचे आव्हान !**

आजचा प्रश्न ब्रिटिश साम्राज्याचा राहिलेला नाही; प्रश्न आहे तो युनायटेड किंगडमच्या भविष्यातील घटनात्मक रचनेचा. स्कॉटलंडमध्ये दुसऱ्या स्वातंत्र्य सार्वमताची मागणी, वेल्समध्ये अधिक अधिकारांची मागणी आणि उत्तर आयर्लंडमध्ये आयरिश एकीकरणाचा प्रश्न यामुळे Westminster समोरील घटनात्मक आव्हान निश्चितच गंभीर झाले आहे.

मात्र, युनायटेड किंगडमची फाळणी अटळ आहे, असा निष्कर्ष सध्या काढणे घाईचे ठरेल. उदाहरणार्थ, ऑक्टोबर २०२६ मधील Irish Times च्या poll-of-polls नुसार उत्तर आयर्लंडमध्ये ४८ टक्के लोक ब्रिटनमध्ये राहण्याच्या बाजूने होते, तर ३५ टक्के लोक संयुक्त आयर्लंडच्या बाजूने होते आणि १७ टक्के अनिश्चित होते. त्यामुळे जनमतही एकसंध नाही.

इतिहासाची विडंबना मात्र लक्षवेधी आहे. एकेकाळी जगाच्या अनेक भागांवर सत्ता गाजवणाऱ्या ब्रिटनसमोर आज स्वतःच्या संघराज्यीय रचनेतील विविध घटकांच्या आकांक्षा समजून घेण्याचे आव्हान आहे. केंद्र आणि घटक राष्ट्रांमधील विश्वास, आर्थिक न्याय, अधिक स्वायत्तता आणि लोकशाही मार्गाने घटनात्मक प्रश्नांची सोडवणूक यावर युनायटेड किंगडमचे भवितव्य मोठ्या प्रमाणात अवलंबून राहणार आहे. साम्राज्याची ताकद टिकवण्यापेक्षा आज ऐक्य टिकवण्यासाठी संवाद आणि परस्पर विश्वास अधिक महत्त्वाचा ठरणार आहे.

**- श्याम ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे**

## म. गांधी

गांधीवाद कालबाह्य
नतद्रष्ट काही म्हणे
खोली विचारांमधली
खरोखर किती जाणे

चुकले कसे महात्मा
शहाणे काढे उणेधुणे
पाऊलखुणा बापुंच्या
चालतो का खुणेखुणे

संयम नसते दुर्बलता
चूर्ण करे लोखंडचणे
यशस्वी ती आंदोलने
विरोध करा शांतपणे

धरा आग्रह सत्याग्रह
खोटे झुके सहजपणे
हिंसाचार कणा कणा
हेचंआमचे खरे दुखणे

अंतस्थ अस्वस्थ अति
भाजून काढते चांदणे
सुटती समस्या सकल
सोडूनि पहा आक्रंदणे

मोहनदासचष्म्यांमधून
उदिष्ट दिसेलं स्पष्टपणे
दृष्टी दोषांची धूळ पुसा
ओळख सांगती दर्पणे

**– हेमंत मुसरीफ, पुणे**
**९७३०३०६९९६**

# कॅप्टन स्मित मच्छार ठरले जिगरबाज हिरो...

कॅप्टन स्मित मच्छार हे अद्भूत शौर्यामुळे चर्चेत आले आहेत फ्लाईदुबई विमान कंपनीचे एक धाडसी भारतीय पायलट आहेत. त्यांनी गंभीर जखमी अवस्थेतही हवेत हजारो फूट उंचीवर स्वतःचा जीव धोक्यात घालून तब्बल १७४ हून अधिक प्रवाशांचे प्राण वाचवले आहेत फ्लाईदुबईचे विमान फ्लाइट FZ1073 दुबईहून तेल अवीव इस्त्रायलकडे जात होते.

विमान सुमारे ३४,००० फूट उंचीवर असताना कॉकपिटमध्ये ओमानच्या सह-पायलटने अचानक विमान क्रॅश करण्याचा प्रयत्न केला आणि कॅप्टन स्मित यांच्यावर चाकूने भीषण हल्ला केला त्यामुळे ते रक्तबंबाळ आणि गंभीर जखमी झाले असूनही कॅप्टन स्मित यांनी हिंमत हारली नाही. त्यांनी त्या सह -पायलटचा हिमतीने सामना केला, त्याला रोखले आणि विमानाचे नियंत्रण स्वतःकडे घेऊन सौदी अरेबियातील ताबुक येथे विमानाचे यशस्वी इमर्जन्सी लँडिंग केले. त्यांच्या या धाडसामुळे विमानातील सर्व प्रवाशांचे प्राण वाचले आहेत कॅप्टन स्मित मच्छार हे मूळचे मुंबई घाटकोपर येथील आहेत. त्यांनी यापूर्वी भारतात 'स्पाइसजेट' विमान कंपनीमध्ये जवळपास ११ वर्षे वरिष्ठ पायलट आणि लाइन ट्रेनिंग कॅप्टन म्हणून काम केले आहे. त्यांना ९,७५० तासांपेक्षा जास्त विमान उड्डाणाचा मोठा अनुभव आहे. ते २०२२ मध्ये फ्लाईदुबई कंपनीत रुजू झाले होते. त्यांच्या या जिगरबाज अतुलनीय शौर्याबद्दल भारतासह आंतरराष्ट्रीय स्तरावरून त्यांचे भरभरून कौतुक केले जात असून तेचं 'खरे हिरो' ठरले आहेत !

**– राजू जाधव,**
**मांगूर जि. बेळगांव**

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

## थोडक्यात बातम्या

## पिक पंचनामे करण्यासाठी कृषी अधिकारी शेतकऱ्यांच्या बांधावर...




**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.०२, पोंभुर्णा (चंद्रपूर) :** खरीप हंगाम २०२६ मध्ये तालुक्यातील पोंभुर्णा, देवाडा खुर्द, नवेगाव मोरे या महसूल मंडळातील सरासरी पर्जन्यमान हे मागील २०२५ वर्षापेक्षा खूप कमी आहे. चालू वर्षी अल निनो च्या पार्श्वभूमीवर तालुक्यात सप्टेंबर अखेरपर्यंत एकूण ५६ टक्के पाऊस झाल्याने धान, कापूस, सोयाबीन,तुर पिकांची अवस्था बिकट झाली आहे. यामध्ये सध्या धान भरणे अवस्थेत कापूस बोंडे लागणे अवस्थेत सोयाबीन दाणे भरणे अवस्थेत असताना पाऊस नसल्याने पिकांच्या उत्पादनात फार मोठी घट होणार आहे.

दिनांक २५ सप्टेंबर २०२६ रोजी निर्गमित झालेल्या शासन निर्णयात पोंभुर्णा तालुका प्रथम कळ (ट्रिगर -१) यात समाविष्ट झाल्याने तालुक्यातील कृषी विभाग, महसूल विभाग, ग्रामविकास विभाग यामधील सहाय्यक कृषी अधिकारी, ग्राम महसूल अधिकारी व ग्रामपंचायत अधिकारी यांना नुकसान झालेल्या शेतपिकाचे पंचनामे करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. तसेच कोणताही शेतकरी सदर वंचित राहावे नाही म्हणून व काटेकोरपणे पिक पंचनामा व्हावे म्हणून सर्व यंत्रणा पिक पंचनामा करण्यासाठी शेतकऱ्यांच्या बांधावर आहेत.

## आर. सी. पटेल विद्यालयात गांधी जयंतीनिमित्त स्वच्छता अभियान व एक दिवसीय श्रमदान शिबीर



**अक्षराज : नंदकुमार बोरसे**

**दि.०२, शिरपूर (धुळे) :** शिरपूर तालुक्यातील भोरखेडा येथील आर. सी. पटेल उच्च माध्यमिक विद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना (NSS) विभागाच्या वतीने राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या जयंतीनिमित्त एक दिवसीय श्रमदान शिबिराचे यशस्वी आयोजन करण्यात आले. या उपक्रमांतर्गत संपूर्ण शालेय परिसरात स्वच्छता मोहीम राबविण्यात आली.

कार्यक्रमाचे आयोजन विद्यालयाचे प्राचार्य सी. एन. पाटील व पर्यवेक्षक एस. डी. पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले.

प्राचार्य सी एन पाटील यांनी स्वयंम सेवकांना सेवा हिच ईश्वर सेवा अशी भावना ठेवून प्रत्येक कार्य करा व राष्ट्रहिताच्या कार्यात अग्रणी रहा असे आवाहन केले. शिबिरादरम्यान स्वयंसेवक व विद्यार्थ्यांनी शालेय परिसर, क्रीडांगण व वर्गखोल्यांची स्वच्छता करून श्रमदानाचे महत्त्व पटवून दिले. या उपक्रमाचे नियोजन राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी प्रा. एस. एम. पाटील व सह-कार्यक्रम अधिकारी प्रा. व्ही. एस. इशी यांनी केले.

शिबिराच्या यशस्वितेसाठी प्रा. पी. टी. चौधरी, प्रा. पी. एच. पाटील, प्रा. कपिल बाविस्कर, प्रा.संगिता हुरसुले यांच्यासह विद्यालयातील शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

## महापालिका मुख्यालयात महात्मा गांधी व लालबहादूर शास्त्री यांना अभिवादन

**अक्षराज : जे. के. पोळ**

**दि.०२, पनवेल :** राष्ट्रपिता महात्मा गांधी आणि भारताचे दुसरे पंतप्रधान लालबहादूर शास्त्री यांच्या जयंतीनिमित्त पनवेल महानगरपालिकेच्या मुख्यालयात आज त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. तसेच महापालिका मुख्यालयासमोरील उद्यानातील राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून आदरांजली वाहण्यात आली.

यावेळी उपायुक्त स्वरूप खारगे, सहायक आयुक्त बाळाराम रातांबे, सामान्य प्रशासन विभागाच्या प्रमुख कीर्ती महाजन, जनसंपर्क अधिकारी वर्षा कुलकर्णी, लिपिक विष्णू सांगळे, लिपिक संदीप पगडे, अग्निशमन दलाचे कर्मचारी तसेच महापालिकेचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

याप्रसंगी महात्मा गांधी आणि लालबहादूर शास्त्री यांच्या विचारांचे स्मरण करून त्यांच्या मूल्यांनुसार सार्वजनिक जीवनात प्रामाणिकपणा, कर्तव्यनिष्ठा, स्वच्छता आणि सामाजिक बांधिलकी जपण्याचा संदेश यावेळी देण्यात आला.

## सिद्धार्थ महाविद्यालयात महात्मा गांधी व लालबहादूर शास्त्री जयंती संपन्न



**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.०२, छत्रपती संभाजीनगर :** रमाई प्रतिष्ठानच्या वतीने सिद्धार्थ महाविद्यालय तसेच सानिका नर्सिंग व बी. डिझाईन महाविद्यालयाच्या संयुक्त विद्यमाने राष्ट्रपिता महात्मा गांधी व माजी पंतप्रधान लालबहादूर शास्त्री यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली.

कार्यक्रमास रमाई प्रतिष्ठानचे सचिव इंजि. साहिल मगरे यांची प्रमुख उपस्थिती होती. सानिका नर्सिंग महाविद्यालयाच्या प्राचार्या नीलम साळुंखे उपस्थित होत्या. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सिद्धार्थ महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. मनोहर वानखडे होते.

यावेळी गांधीजी व शास्त्रीजी यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी प्राचार्य डॉ.मनोहर वानखडे म्हणाले की, महात्मा गांधी यांचे सत्य, अहिंसा, स्वच्छता, सामाजिक समता आणि माणुसकीचे विचार आजही तितकेच महत्त्वाचे आहेत. तर लालबहादूर शास्त्री यांचे साधेपणा, प्रामाणिकपणा, शिस्त आणि देशसेवेचे कार्य विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी आहे. विद्यार्थ्यांनी दोन्ही महान नेत्यांच्या विचारांचा आदर्श घेऊन जबाबदार नागरिक बनावे, असे आवाहन त्यांनी केले.

कार्यक्रमाचे संचालन प्रतीक यांनी केले. यावेळी डॉ.निखिल साळवे, डॉ.आकाश घुले, डॉ.वर्षा, डॉ.मगरे, प्रा.कल्पना कनकुटे यांच्यासह प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## खापरखेडा रेल्वे चौकी मुख्यबाजारपेठेत महिलांसाठी सुलभ शौचालयाची गरज : अशोक झिंगरे



**अक्षराज : दिवाकर घेर**

**दि.०२, नागपूर :** औद्योगिक आणि वेगाने विस्तारत होत असलेल्या खापरखेडा शहरातील अण्णामोड ते रेल्वे चौकी हा परिसर दिवसभर नागरिकांच्या वर्दळीने गजबजलेला असतो. या मार्गावर बाजारपेठ, विविध दुकाने, व्यावसायिक आस्थापना तसेच रेल्वे चौकी मुख्य बाजारपेठ असल्याने महिला, युवती आणि नागरिकांची मोठी ये-जा सुरू असते.

मात्र, या प्रमुख भागात महिलांसाठी स्वतंत्र व सुविधायुक्त सुलभ शौचालयाची सोय नसल्याने सार्वजनिक सुविधांच्या नियोजनावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. मुख्य बाजारपेठ रेल्वे चौकी परिसरात नागरिकांसाठी आवश्यक मूलभूत सुविधा उपलब्ध नसल्याची स्थिती आहे. विशेषतः महिलांना शौचालयाची गरज भासल्यास मोठी अडचण निर्माण होते. आसपास योग्य आणि सुरक्षित सुविधा नसल्याने अनेक महिलांना गैरसोय सहन करावी लागते. शहरातील वर्दळीच्या ठिकाणी महिलांसाठी स्वच्छ, सुरक्षित आणि वापरण्यास योग्य शौचालय असणे ही प्राथमिक नागरी गरज असताना या प्रश्नाकडे अद्याप गांभीर्याने पाहिले गेले नसल्याची नागरिकांची भावना आहे. एकीकडे रेल्वे चौकीवर घाणीच्या विळख्यात असलेले शौचालय बेवारस झाले आणि प्रशासनाने लावलेला खर्च व्यर्थ गेला असे नागरिकांचे म्हणणे आहे.

या शौचालयात अस्वच्छता असुन अपराधिक लोक, दारू पिणारे,आणि विशेष म्हणजे डुकरांचा व केरकचऱ्याचा घाणीत आहे. तेच शौचालय मुच्य मार्गावर लगतच्या अतिक्रमण जागी असते मुख्य मार्गतिगत फ्रंटवर असते तर महिलांचा उपयोगात आले असते. आजच्या स्थितीत त्या घाणीच्या विळख्यातील शौचालयात महिला, मुली जाऊ शकत नाही, याची स्थिती सर्वानांच माहिती आहे.संबंधित स्थानिक प्रशासनाने तसेच महाजेनको आणि इतर संबंधित यंत्रणांनी समन्वय साधून या प्रश्नावर कायमस्वरूपी उपाययोजना करावी अशी नागरिकांची इच्छा आहे. केवळ सुविधा उभारून न थांबता तिची नियमित स्वच्छता, पाणीपुरवठा, प्रकाशव्यवस्था आणि सुरक्षितता याकडेही लक्ष द्यावे, अशी नागरिकांची अपेक्षा आहे.कचरा, घाणीचे साम्राज्य आणि अस्वच्छ वातावरणामुळे उपलब्ध सुविधा अपेक्षित उपयोगासाठी कितपत योग्य आहेत, असा प्रश्न उपस्थित केला जात आहे. महिलांसाठी स्वतंत्रपणे सुरक्षित आणि स्वच्छ शौचालयाची आवश्यकता असताना परिसरातील अस्वच्छता ही समस्या अधिक गंभीर बनवत आहे.

**ना बसथांबा, ना शौचालय**

रेल्वे चौकी परिसरात येणाऱ्या नागरिकांसाठी बसथांब्याचीही पुरेशी व्यवस्था नसल्याची तक्रार आहे. त्यामुळे प्रवाशांना रस्त्याच्या कडेला किंवा उपलब्ध जागेत थांबावे लागते. त्यातच महिलांसाठी स्वतंत्र सुलभ शौचालय नसल्याने या भागातील नागरी सुविधांचा अभाव अधिक प्रकर्षाने जाणवतो.

**प्रशासनाने तातडीने लक्ष द्यावे**

खापरखेडा शहरातील वाढती लोकसंख्या आणि वाढती वर्दळ लक्षात घेता प्रमुख चौक, बाजारपेठ आणि सार्वजनिक ठिकाणी मूलभूत नागरी सुविधा उपलब्ध करून देणे गरजेचे आहे. अण्णामोड ते रेल्वे चौकी परिसरात महिलांसाठी स्वच्छ, प्रकाशव्यवस्थेसह आणि नियमित देखभालीची सुविधा असलेले स्वतंत्र सुलभ शौचालय उभारावे, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

> खापरखेडा मुख्य बाजारपेठ रेल्वे चौकी परिसरात दिवसभर ये-जा करणाऱ्या लोकांची गर्दी असते. यात महिला मुली सुद्धा ये, जा करतात. महिलांसाठी स्वतंत्र सुलभ शौचालय आणि बसथांबा या दोन्ही सुविधा उपलब्ध झाल्यास नागरिकांची मोठी गैरसोय दूर होईल.
>
> **– अशोक झिंगरे, शिवसेना उपजिल्हाप्रमुख (शिंदे गट)**

## दुकानदारांच्या काळजाचा ठोका चूकवणारी बातमी !

### सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाने, व्यापारी वर्गात मोठी खळबळ



**अक्षराज : जे. के. पोळ**

**दि.०२, नवी मुंबई :** घरगुती किंवा निवासी भागात (Residential Area) बस्तान मांडून धंदा करणाऱ्या दुकानदारांसाठी सर्वात मोठी आणि हादरवून टाकणारी बातमी समोर आली आहे. सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या एका अत्यंत कठोर व धडक निर्णयामुळे (२२ सप्टेंबर २०२६) देशभरातील निवासी क्षेत्रांमधील अनधिकृत व्यावसायिक वापरावर थेट टांगती तलवार लटकली आहे. न्यायालयाच्या या दणक्यानंतर नियमांना बगल देऊन वर्षानुवर्षे व्यवसाय करणाऱ्या दुकानदारांचे धाबे दणाणले असून, संबधित वर्तुळात एकच खळबळ उडाली आहे.

**कोर्टाचा दणका ! एकही अनधिकृत दुकान सुटणार नाही :** सर्वोच्च न्यायालयाने स्थानिक प्रशासन आणि महानगरपालिकांना अतिशय स्पष्ट आणि सक्त आदेश दिले आहेत. या आदेशानुसार, ज्या जमिनीचा किंवा इमारतीचा वापर केवळ 'राहण्यासाठी' (Residential) आरक्षित आहे, तिथे एकही व्यावसायिक दुकान किंवा युनिट चालू दिले जाणार नाही. न्यायालयाच्या या भूमिकेमुळे आता प्रशासनाला कसलीही हयगय न करता थेट सीलिंगची कारवाई करावीच लागणार आहे.

**'पिक अँड चूज' धोरणाला सक्त मज्जाव :** अनेकदा प्रशासनाला मॅनेज करून किंवा राजकीय वशिलेबाजी वापरून काही जण कारवाई टाळतात. मात्र, सर्वोच्च न्यायालयाने स्पष्ट बजावले आहे की, कारवाई करताना कसलाही पक्षपात किंवा 'निवडक कारवाई' (Pick and Choose) खपवून घेतली जाणार नाही. सर्व नियमबाह्य दुकानांवर सरसकट आणि एकसमान कारवाईचा बडगा उगारलाच पाहिजे, अन्यथा कोर्टाच्या रोषाला सामोरे जावे लागेल, असा थेट इशाराच देण्यात आला आहे.

**कारवाईची टांगती तलवार :** केवळ कागदोपत्री 'निवासी' असणाऱ्या जागेवर अनधिकृतपणे धंदा थाटणाऱ्यांवर आता स्थानिक प्रशासन काय भूमिका घेणार आणि हा आदेश अमलात आणण्यासाठी कधीपासून प्रत्यक्ष कारवाईला सुरुवात होणार, याकडे संपूर्ण व्यापारी वर्गाचे डोळे लागले आहेत.

## श्री खरवली आई मंदिर; ५ कोटींच्या सुशोभीकरणाचा निधी कागदावरच? रस्त्याची दुरवस्था कायम



**अक्षराज : विनोद वास्कर**

**दि.०२, शिळगाव (ठाणे) :** ठाणे जिल्ह्यातील शिळगाव, पोस्ट डावले येथे सह्याद्रीच्या पर्वतरांगेतील कर डोंगरीच्या डोंगरावर श्री खरवली आईचे जागृत व पुरातन देवस्थान वसलेले आहे. हे मंदिर ब्रिटिशकालीन आणि लष्करी काळाच्याही अगोदरपासून अस्तित्वात असलेले ऐतिहासिक मंदिर म्हणून ओळखले जाते.

नवसाला पावणारी आई - श्री खरवली आई ही नवसाला पावणारी, हाकेला धावणारी व जागृत देवता म्हणून संपूर्ण महाराष्ट्रात प्रसिद्ध आहे. वर्षाचे बाराही महिने येथे नवस फेडण्यासाठी भाविकांची गर्दी असते.

नवरात्र उत्सव ११ ऑक्टोबरपासून -येत्या ११ ऑक्टोबर २०२६ पासून नवरात्र उत्सवाला सुरुवात होत असून नऊ दिवस भजन, हरिपाठ, देवीची गाणी, होम-हवन, महाभंडारा आणि सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन श्री खरवली आई सेवा ट्रस्ट, शिळगाव यांच्यावतीने करण्यात आले आहे. या काळात लाखो भाविक महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून दर्शनासाठी येतात. अनेक भाविक नऊ दिवस कडक उपवास करतात तर अनेकजण चप्पल न घालता अनवाणी पायाने दर्शनासाठी येतात. भाविकांसाठी नाष्टा, चहापाण्याची सोय ट्रस्टकडून केली जाते.

**५ कोटींच्या निधीचे काय झाले? :** या अगोदर निवडणुकीपूर्वी मंदिराच्या सुशोभीकरणासाठी ५ कोटी रुपये निधी देण्याची घोषणा काही राजकीय नेत्यांनी केली होती. मात्र प्रत्यक्षात आजपर्यंत एक रुपयाही निधी मंदिरापर्यंत पोहोचला नाही. हा निधी कोणत्या कारणामुळे अडकला आहे? सुशोभीकरणाचे काम कधी होणार? असा सवाल आता हजारो भाविक भक्त विचारत आहेत. घोषणा फक्त निवडणुकीपुरतीच होती का, असा संतापही व्यक्त होत आहे.

**रस्ता आणि पथदिव्यांची दुरवस्था :** दुसरीकडे मंदिराकडे जाणाऱ्या रस्त्याची अत्यंत दयनीय अवस्था झाली आहे. खड्डेमय रस्त्यामुळे वृद्ध, महिला आणि अनवाणी येणाऱ्या भाविकांना मोठा त्रास होत आहे. या मार्गावर पथदिवे नसल्याने रात्रीच्या वेळी अंधाराचे साम्राज्य असते. त्यामुळे लोकप्रतिनिधी, ठाणे महानगरपालिका आणि वन खात्याने तात्काळ लक्ष घालून ५ कोटींच्या सुशोभीकरण निधीचा पाठपुरावा करून रस्ता दुरुस्ती व पथदिव्यांचे काम नवरात्रीपूर्वी करावे, अशी मागणी लाखो भाविक भक्तांनी केली आहे.

**ठिकाण :** शिळगाव, पोस्ट डावले, खरवली आई परिसर (भोलेनाथ नगर), मुंब्रा-पनवेल रोड, शिळफाटा चौकापासून अर्धा किमीवर.

## न्यू इंग्लिश हायस्कूल तथा कनिष्ठ महाविद्यालयात महात्मा गांधी व लालबहादूर शास्त्री जयंती साजरी



**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.०२, चंद्रपूर :** दि एज्युकेशन सोसायटी, चंद्रपूरद्वारा संचालित न्यू इंग्लिश हायस्कूल तथा कनिष्ठ महाविद्यालय, चंद्रपूर येथे दि. २ ऑक्टोबर २०२६ रोजी राष्ट्रपिता महात्मा गांधी व भारताचे माजी पंतप्रधान लालबहादूर शास्त्री यांची जयंती उत्साहपूर्ण वातावरणात साजरी करण्यात आली.

कार्यक्रमाच्या प्रारंभी शाळेच्या प्राचार्या बैद मॅडम यांच्या हस्ते महात्मा गांधी व लालबहादूर शास्त्री यांच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यानंतर शाळेच्या राजीव गांधी क्रीडा संकुल परिसरात असलेल्या राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या पूर्णाकृती पुतळ्याला प्राचार्या बैद मॅडम यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून आदरांजली वाहण्यात आली. या जयंती कार्यक्रमानिमित्त विद्यार्थ्यांनी महात्मा गांधी व लालबहादूर शास्त्री यांच्या जीवनकार्यावर आधारित भाषणे सादर केली. विद्यार्थ्यांनी आपल्या भाषणातून महात्मा गांधी यांचे सत्य, अहिंसा, शांतता आणि सत्याग्रहाचे तत्त्वज्ञान तसेच लालबहादूर शास्त्री यांचे साधे राहणीमान, प्रामाणिकपणा, देशभक्ती आणि राष्ट्रसेवेतील योगदान यांची माहिती दिली.

याप्रसंगी शाळेच्या प्राचार्या बैद मॅडम यांनी आपल्या मार्गदर्शनपर भाषणातून दोन्ही महान व्यक्तिमत्त्वांच्या जीवनचरित्रावर प्रकाश टाकला. महात्मा गांधी यांनी सत्य आणि अहिंसेच्या मार्गाने स्वातंत्र्यलढ्याला दिलेले नेतृत्व तसेच लालबहादूर शास्त्री यांनी देशाच्या विकासासाठी आणि संरक्षणासाठी केलेले कार्य यांचे महत्त्व त्यांनी विद्यार्थ्यांना समजावून सांगितले. या महापुरुषांचे विचार आत्मसात करून विद्यार्थ्यांनी आपल्या जीवनात सत्य, शिस्त, प्रामाणिकपणा आणि देशसेवेची भावना जोपासावी, असे आवाहन त्यांनी केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कु. सीमा शेडाम मॅडम यांनी केले. कार्यक्रमाला शाळेच्या पर्यवेक्षिका नरड मॅडम, सर्व शिक्षक-शिक्षिका, शिक्षकेतर कर्मचारी तसेच विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

अक्षराज



# पनवेल महानगरपालिकेच्या 'दशकपूर्ती महोत्सवा'ला प्रहार संघटनेचा आक्षेप

## गेल्या १० वर्षांच्या कामांची श्वेतपत्रिका जाहीर करण्याची मागणी; आयुक्त व महापौरांना निवेदन

**अक्षराज : अभिनव येलवे**

**दि.०२, पनवेल (नवी मुंबई) :** पनवेल महानगरपालिकेच्या स्थापनेला १० वर्षे पूर्ण होत असल्याच्या पार्श्वभूमीवर आयोजित करण्यात येत असलेल्या 'दशकपूर्ती महोत्सवा'वर प्रहार जनशक्ती पक्षाने तीव्र आक्षेप नोंदविला आहे. राज्यातील दुष्काळजन्य परिस्थिती, शेतकऱ्यांसमोरील संकटे आणि पनवेलकर नागरिकांना भेडसावणाऱ्या मूलभूत समस्यांचा विचार करता कोट्यवधी रुपयांचा महोत्सव साजरा करणे योग्य नसल्याचे मत संघटनेने व्यक्त केले आहे.

यासंदर्भात प्रहार संघटनेचे रायगड जिल्हाध्यक्ष डॉ.सुनील शिरीषकर यांनी महापौर व आयुक्तांना लेखी निवेदन देऊन महोत्सवाच्या खर्चाची संपूर्ण माहिती जाहीर करण्याची तसेच गेल्या १० वर्षांच्या कामांची श्वेतपत्रिका प्रसिद्ध करण्याची मागणी केली आहे.

डॉ. शिरीषकर यांनी दिलेल्या माहितीनुसार, पनवेल शहर व परिसरातील अनेक भागांमध्ये नागरिकांना अद्यापही पाणीटंचाई, खराब रस्ते, आरोग्य सुविधांचा अभाव आणि पायाभूत




सुविधांच्या समस्यांना सामोरे जावे लागत आहे. विशेषतः आदिवासी व ग्रामीण भागांमध्ये विकासकामांची गरज असताना प्रशासनाने उत्सवांवर मोठा खर्च करणे ही जनभावनांशी विसंगत बाब असल्याचा आरोप त्यांनी केला.पालिकेने जाहीर केलेल्या कार्यक्रमांमध्ये क्रिकेट स्पर्धा, शाहिरी स्पर्धा, नाट्य महोत्सव, रील्स स्पर्धा, व्याख्यानमाला, विविध प्रदर्शनांचे आयोजन तसेच सांस्कृतिक कार्यक्रमांचा समावेश आहे.

मात्र या महोत्सवासाठी एकूण किती निधी खर्च केला जाणार आहे, विविध कार्यक्रमांसाठी किती आर्थिक तरतूद करण्यात आली आहे, निविदा प्रक्रिया पारदर्शकपणे राबविण्यात आली आहे का? याबाबत कोणतीही अधिकृत माहिती नागरिकांसमोर ठेवण्यात आलेली नाही, असा मुद्दा प्रहार संघटनेने उपस्थित केला आहे.संघटनेच्या निवेदनात जाहिरातबाजी, विद्युत रोषणाई, सजावट, व्यासपीठ उभारणी, कलाकारांचे मानधन, स्मरणिका प्रकाशन, महानगरपालिका गीत निर्मिती आणि प्रसिद्धी यंत्रणेवर किती खर्च होणार याचा तपशील सार्वजनिक करण्याची मागणी करण्यात आली आहे.

नागरिकांच्या कररूपी पैशातून हा खर्च केला जाणार असल्याने त्याचा हिशेब देणे ही प्रशासनाची कायदेशीर आणि नैतिक जबाबदारी असल्याचे डॉ. शिरीषकर यांनी नमूद केले.

प्रहार संघटनेने महोत्सवाऐवजी शहरातील मूलभूत प्रश्न सोडविण्यास प्राधान्य देण्याची मागणी केली आहे. खड्डेमुक्त रस्ते, नियमित व मुबलक पाणीपुरवठा, दर्जेदार आरोग्य सेवा, आदिवासी भागातील पायाभूत सुविधा आणि नागरिकांच्या दैनंदिन गरजांशी संबंधित विकासकामांवर निधी खर्च करावा, असे संघटनेचे म्हणणे आहे.

**'पंतप्रधानांच्या आवाहानाशी विसंगत' – डॉ. शिरीषकर**

डॉ. सुनील शिरीषकर यांनी केंद्र सरकारच्या काटकसरीच्या भूमिकेचाही उल्लेख केला. त्यांनी म्हटले की, देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आंतरराष्ट्रीय परिस्थिती व एल-निनोच्या संभाव्य परिणामांमुळे आर्थिक काटकसर करण्याचे आवाहन केले आहे.

अशा परिस्थितीत केंद्र, राज्य आणि स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये सत्ताधारी पक्ष एकच असताना कोट्यवधी रुपयांचा महोत्सव आयोजित करणे हे त्या आवाहनाशी विसंगत दिसते. सर्वसामान्य नागरिकांना खर्च कमी करण्याचा सल्ला दिला जातो, मात्र सत्ताधारी संस्था मोठ्या प्रमाणात खर्च करतात, हा दुटप्पीपणा असल्याची भावना नागरिकांमध्ये निर्माण होत आहे.प्रहार संघटनेने महोत्सवाच्या खर्चाबाबत संपूर्ण पारदर्शकता ठेवण्याची, गेल्या दशकातील विकासकामांचा तपशील जाहीर करण्याची आणि प्रशासकीय अनियमिततांची चौकशी करण्याची मागणी केली असून, याबाबत प्रशासन काय भूमिका घेते याकडे पनवेलकरांचे लक्ष लागले आहे.

# ज्ञानमाता आश्रमशाळेत कबड्डीचा थरार; कवाडा ठाक्करपाडा शाळेच्या नवीन इमारतीचे उद्घाटन

## आमदार कॉ. विनोद निकोले यांच्या हस्ते विविध शैक्षणिक उपक्रमांना प्रारंभ; विद्यार्थी व शिक्षकांची मोठी उपस्थिती

**अक्षराज : निलेश कासट**

**दि.०२, तलासरी (पालघर) :** ज्ञानमाता आदिवासी माध्यमिक व उच्च माध्यमिक आश्रमशाळा व कनिष्ठ महाविद्यालय, झरी येथे दि.०१ ऑक्टोबर रोजी आंतरशालेय कबड्डी स्पर्धेचे उत्साहात उद्घाटन करण्यात आले. तसेच याच दिवशी कवाडा ठाक्करपाडा येथील जिल्हा परिषद शाळेच्या नवीन इमारतीचे उद्घाटन डहाणू विधानसभा आमदार कॉ. विनोद निकोले यांच्या हस्ते करण्यात आले. या दोन्ही कार्यक्रमांमुळे परिसरातील विद्यार्थी, शिक्षक व पालकांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले.

झरी येथील ज्ञानमाता आदिवासी माध्यमिक व उच्च माध्यमिक आश्रमशाळेत आयोजित आंतरशालेय कबड्डी स्पर्धेत परिसरातील विविध शाळांमधील विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. उद्घाटनप्रसंगी आमदार कॉ. विनोद निकोले यांनी सहभागी खेळाडूंना शुभेच्छा देत ग्रामीण व आदिवासी भागातील विद्यार्थ्यांमध्ये क्रीडा क्षेत्रातील मोठी गुणवत्ता आहे. या गुणवत्तेला योग्य व्यासपीठ व प्रोत्साहन मिळणे आवश्यक असल्याचे सांगितले. विद्यार्थ्यांनी खेळामध्ये खिलाडूवृत्ती, शिस्त व संघभावना जपत उत्कृष्ट कामगिरी करावी, असे आवाहन त्यांनी केले. कबड्डी स्पर्धेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये शारीरिक तंदुरुस्ती, संघभावना, आत्मविश्वास, शिस्त तसेच नेतृत्वगुण विकसित होण्यास मदत होते. स्पर्धेदरम्यान विविध संघांमध्ये चुरशीच्या लढती रंगल्या.

मैदानावर खेळाडूंनी आपल्या कौशल्याचे प्रदर्शन करत उपस्थितांची दाद मिळवली.या स्पर्धेच्या यशस्वी आयोजनासाठी ज्ञानमाता सदन संस्था, तलासरीचे संचालक फा. निलम लोपीस, शाळा संचालक फा. सॅबी कोरिया, प्राचार्या सि. बस्तियान फर्नांडिस, क्रीडा शिक्षक अशोक मांडवडे व दिलीप राबड, वरखंडा शाळेच्या मुख्याध्यापिका सि. टेल्मा डिसोझा, उपलाट शाळेच्या मुख्याध्यापिका सि. ओलिंडा यांच्यासह



शिक्षकवृंद, कर्मचारी व विद्यार्थ्यांनी विशेष मेहनत घेतली. दरम्यान, कवाडा ठाक्करपाडा येथील जिल्हा परिषद शाळेच्या नवीन इमारतीचेही उद्घाटन आमदार कॉ. विनोद निकोले यांच्या हस्ते करण्यात आले.

नवीन इमारतीमुळे परिसरातील विद्यार्थ्यांना अधिक सुरक्षित व चांगल्या शैक्षणिक सुविधा उपलब्ध होणार असून, शाळेच्या विकासाला चालना मिळणार आहे.या उद्घाटनप्रसंगी सरपंच दर्शना बोदले, गटविकास अधिकारी वैभव साबळे, गटशिक्षणाधिकारी निमिश मोहिते, मुख्याध्यापक नवीन धोदडे, विजय बोदले यांच्यासह शिक्षकवृंद व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. उपस्थित मान्यवरांनी नवीन शालेय इमारतीबद्दल समाधान व्यक्त करून विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण व आवश्यक सुविधा मिळण्यासाठी शुभेच्छा दिल्या. क्रीडा आणि शैक्षणिक सुविधांच्या माध्यमातून आदिवासी भागातील विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाला चालना मिळत असून, अशा उपक्रमांचे सातत्याने आयोजन होणे गरजेचे असल्याचे यावेळी उपस्थितांनी सांगितले.

# चारठाणा येथे एकाच रात्री ५ जागेवर चोऱ्या नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण



**अक्षराज : अलीम शेख**

**दि.०२, चारठाणा (परभणी) :** शहरातील मातंग मोहल्ला, आतार मोहल्ला व कुरेशी मोहल्यात दिनांक १ ऑक्टोबरच्या मध्यरात्री अज्ञात चोरट्यांनी प्रत्येक घरातील कुलूप तोडून सोन्या चांदीचे दागिने व रोख रकमेचे एकूण अंदाजे २,७५,००० रुपयाच्या मुद्देमाल अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याची घटना घडल्यामुळे नागरिकांमध्ये ऐन दुष्काळात भीतीचे वातावरण पसरले आहे याबाबत अधिक माहिती आशिकी चारठाणा येथील नागरिक दुष्काळाच्या छायेत सापडले असून त्यांच्यावर पुन्हा दुसरे चोरीचे संकट पुढे आले आहे दिनांक १ ऑक्टोबर गुरुवार च्या मध्यरात्री कसबा विभागातील मुसक्कीन बु ढ न कुरेशी यांच्या घराचे कुलूप तोडून कपाटातील नगदी रोख अंदाजे दीड लाख रुपये तर कसबा विभागातील माधव गिराम यांच्या घराचे कुलूप तोडून अज्ञात चोरट्याने आत प्रवेश करून कपाट व सर्व साहित्याची झडती घेऊन अंदाजे १० ते १५ हजार रुपये नगदी रोख चोरून नेले विशेष म्हणजे इतक्यावर न थांबता कसबा विभागातून विभागात आपला मोर्चा वळविला व मातंग गल्लीतील ग्रामपंचायत सदस्य गणेश पारवे यांच्या घराचे कुलूप तोडून कपाटाची झडती घेऊन कपाटा मधील मधील नगदी रोख पन्नास हजार रुपये चोरून नेले तर शेख बाबू शेख गणी हे घराला कुलूप लावून ऊस तोडीला गेले असता अज्ञात चोरट्याने याच्या फायदा घेऊन त्यांच्या घरातील त्यांच्या मुलीचे सोन्या चांदीचे दागिने चोरून नेले तर जितेश नीतीराम जाधव यांच्या घरातील दाराचे कुलूप तोडून आत प्रवेश करून कपाट व सर्व साहित्याची झाडाझडती घेऊन कपाटा मधील अंदाजे नगदी रोख ६५ हजार रुपये व सोन्याचे दोन अंगठ्या, सोन्याची बोरमाळ एक तोळ्याची, सोन्याची गहू पोत एक तोळ्याची, तर पत्री सेवन पीस सात ग्राम सोन्याची अज्ञात चोरट्याने पळविला घटना दुसऱ्या दिवशी सकाळी उघड झाली या घटनेची माहिती पोलिसांना मिळताच चारठाणा पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक बालाजी पुंड, बीट जमदार उद्धव सातपुते यांनी चोरी झालेल्या घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली चोरीच्या घटनास्थळी श्वन पथकाला पाचारण करण्यात आले होते तसेच फिंगरप्रिंटला हि पाचारण करण्यात आले होते विशेष म्हणजे कोरडा दुष्काळ पडल्यामुळे नागरिक अडचणीत होते व त्यातच पुन्हा अज्ञात चोरट्याने नागरिकांना भयभीत करून सोडले आहे त्यामुळे पोलिसासमोर एक मोठा आव्हान उभा राहिला आहे दरम्यान पोलिसांनी या अज्ञात चोऱ्याची तात्काळ दाखल घेऊन रात्रीची गस्त घालून गावातील नागरिकांना धीर द्यावा अशी मागणी पुढे येत आहे अज्ञात चोरट्या नि नगदी रोख २ लाख ७५ हजार रुपये व सोन्या चांदीचे दागिने असा एकूण मुद्देमाल लंपास केला आहे.

# मैदानी स्पर्धेत महाराष्ट्र विद्यालयाचे सुयश

**अक्षराज : दिवाकर घेर**

**दि.०२, नागपूर :** राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ मैदान रवीनगर नागपूर येथे संपन्न झालेल्या सावनेर तालुकास्तरीय शालेय मैदानी स्पर्धेत महाराष्ट्र विद्यालयाच्या खेळाडूंनी उल्लेखनीय कामगिरी करून प्रथम क्रमांक पटकावून सुवर्णपदक प्राप्त केले.१७ वर्षे वयोगटात



अनुराग गुप्ता १०० मीटर व २०० मीटर धावणे दोन्ही क्रीडा प्रकारात प्रथम क्रमांक प्राप्त केला. तर १९ वर्षे वयोगटात सचिन उईके लांब उडी व तिहेरी उडी मध्ये प्रथम क्रमांक पटकावला असुन खेळाडूंना क्रीडाशिक्षक धैर्यशील सुटे यांचे मार्गदर्शन लाभले.

प्राविण्य प्राप्त खेळाडू नागपूर येथे होणाऱ्या जिल्हास्तरीय शालेय मैदानी स्पर्धेत सावनेर तालुक्याचे प्रतिनिधित्व करणार आहे. महाराष्ट्र राज्य शिक्षण संस्थेचे मार्गदर्शक, विश्वस्त व माजी मंत्री सुनील केदार, अध्यक्ष सुधीर केदार, विद्यालयाचे मुख्याध्यापक अरुण वडस्कर, उपमुख्याध्यापक जितेंद्र ठाकरे, पर्यवेक्षक नरेंद्र माहूरतळे, क्रीडा शिक्षक धैर्यशील सुटे, धर्मेंद्र सूर्यवंशी, सर्व शिक्षक वृंद व कर्मचारी वर्ग यांनी विजयी खेळाडूंचे अभिनंदन केले.

## थोडक्यात बातम्या

### माथेरानमध्ये NCMC कार्डसाठी विशेष शिबिर

### सार्वजनिक वाहतुकीच्या प्रवासासाठी ठरणार उपयुक्त सुविधा

**अक्षराज : चंद्रकांत सुतार**

**दि.०२,माथेरान :** माथेरानमधील नागरिकांना सार्वजनिक वाहतुकीच्या प्रवासात डिजिटल पेमेंटची सुविधा मिळावी. यासाठी NCMC (National Common Mobility Card) कार्ड काढण्याचे विशेष शिबिर आयोजित करण्यात आले. रविंद्र परब यांच्या वाढदिवसानिमित्त लेक व्ह्यू हॉटेलसमोर या शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. छउचउ हे ठींझरू आधारित कॉन्टॅक्टलेस कार्ड असून, ज्या सार्वजनिक वाहतूक सेवांमध्ये NCMC सुविधा उपलब्ध आहे, त्या ठिकाणी कार्ड मशीनवर 'टॅप' करून प्रवासाचे भाडे अदा करता येते. त्यामुळे वारंवार प्रवास करणाऱ्या नागरिकांना रोख रक्कम किंवा सुट्टे पैसे बाळगण्याची गरज कमी होणार आहे. माथेरानमधून मुंबई, नवी मुंबई, ठाणे आदी शहरांमध्ये ये-जा करणाऱ्या नागरिकांसाठी रेल्वे, मेट्रो तसेच बस प्रवासात NCMC कार्ड उपयुक्त ठरू शकते. विशेषतः मुंबईतील सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेचा नियमित वापर करणाऱ्या प्रवाशांना या सुविधेचा लाभ घेता येणार आहे. या शिबिराच्या आयोजनासाठी वैभव परब, रविंद्र परब, संजय भोसले, परेंदू मोरे, नताशा मोरे, त्रिगुनाईत तिवारी, मनोज भोईर आदींनी विशेष मेहनत घेतली. नागरिकांनीही या उपक्रमाला चांगला प्रतिसाद देत NCMC कार्डाबाबत माहिती घेतली.

### वन्यजीव सप्ताहानिमित्त निफाड तालुक्यात भव्य जनजागृती रॅली संपन्न



**अक्षराज : सुनील क्षिरसागर**

**दि.०२, निफाड (नाशिक) :** वन्यजीव सप्ताह २०२६ निमित्ताने येवला वनपरिक्षेत्र कार्यालय (प्रादेशिक) आणि 'AREAS फाउंडेशन' यांच्या संयुक्त विद्यमाने आज निफाड तालुक्यात भव्य जनजागृती रॅलीचे यशस्वी आयोजन करण्यात आले. सदर रॅलीची सुरुवात सकाळी ९ वाजता निफाड येथील वैनतेय विद्यालयापासून करण्यात आली. ही रॅली विविध गावांतून मार्गक्रमण करत गोदावरी माध्यमिक विद्यालय, शिंगवे येथे उत्साहात समाप्त झाली. रॅली दरम्यान मार्गावरील गावोगावी जाऊन नागरिकांना झाडांचे महत्त्व, वन्यजीवांचे संरक्षण व संवर्धन तसेच सध्याच्या काळात अत्यंत महत्त्वाच्या ठरणाऱ्या 'मानव-बिबट्या सहजीवन' या विषयावर सखोल मार्गदर्शन व जनजागृती करण्यात आली. या जनजागृती मोहिमेत येवला वनपरिक्षेत्र अधिकारी राहुल घुगे यांच्या मार्गदर्शनाखाली वनपरिमंडळ अधिकारी जयप्रकाश शिरसाठ, तुषार देसाई, वनरक्षक विजय दोंदे, गोपाल राठोड, ज्ञानेश्वर वाघ, वंदना खरात, विशाल बलसाने यांनी सहभाग घेतला. तसेच कवायत प्रशिक्षक अंकुश गुंड, AREAS फाउंडेशनचे सुशांत रणशूर, रेस्क्यू टीम निफाडचे सदस्य आणि लासलगाव सर्पमित्र टीमचे असिफ पटेल यांच्यासह वनकर्मचारी व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### कोयता हातात, तडीपारचा आदेश खिशात

#### येरवड्यात पोलिसांनी आवळल्या मुसक्या

**अक्षराज : प्रणिल कुसाळे**

**दि.०२, पुणे :** तडीपारचा आदेश धाब्यावर, हातात कोयता आणि येरवड्यात बिनधास्त वावर! मात्र लक्ष्मीनगर पोलिसांच्या सतर्क नजरेतून हा 'गेम' सुटला नाही. तडीपार आदेशाचा भंग करून येरवडा परिसरात फिरणाऱ्या ओमकार युवराज सोनवणे (वय २५, रा. लक्ष्मीनगर, येरवडा) याला पोलिसांनी लोखंडी कोयत्यासह जेरबंद केले.'आदेश तोडला, पण पोलिसांच्या नजरेतून बचावता आलं नाही', अशीच या कारवाईची चर्चा आहे. पो. शि. किरण भागीत आणि राहुल परदेशी यांनी मिळालेल्या माहितीच्या आधारे आरोपीच्या हालचालींवर लक्ष ठेवत त्याला ताब्यात घेण्यात महत्त्वाची भूमिका बजावली.पोलिसांच्या माहितीनुसार, सोनवणे याच्यावर पोलीस उपायुक्त परिमंडळ-४ यांच्या आदेशाने दोन वर्षांसाठी पुणे शहर, पिंपरी-चिंचवड आयुक्तालय आणि पुणे जिल्ह्यातून तडीपारीची कारवाई करण्यात आली आहे. असे असतानाही २ ऑक्टोबर रोजी सकाळी साडेदहा वाजता तो डेक्कन कॉलेज कॅम्पस परिसरातील हजरत सय्यद शमशुद्दीन कादरी दर्ग्याजवळ आढळून आला. तसेच, २९ सप्टेंबर ते १२ ऑक्टोबर दरम्यान घातक शस्त्रे बाळगण्यास मनाई आदेश असतानाही त्याच्याकडे १५० रुपये किमतीचा लोखंडी कोयता आढळून आला. याप्रकरणी महाराष्ट्र पोलीस अधिनियम कलम १४२, ३७(१)(३) सह १३५ आणि भारतीय हत्यार कायदा कलम ४(२५) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला.ही कारवाई वरिष्ठ पोलीस निरीक्षक युवराज नांद्रे यांच्या मार्गदर्शनाखाली सपोनि निखिल पवार, पोलीस शिपाई किरण भागीत, राहुल परदेशी व श्री.कांबळे यांनी केली.

### गोंडपिपरी पोलीस ठाण्याची धुरा आता हेमंत पवारांकडे

**अक्षराज : संतोष बांदूरकर**

**दि.०२, गोंडपिपरी (चंद्रपूर) :** गोंडपिपरी पोलीस ठाण्यात प्रशासकीय फेरबदल झाला असून, ठाणेदार रमेश हत्तीगोटे यांची बदली करण्यात आली आहे. त्यांच्या जागी धाबा पोलीस ठाण्याचे ठाणेदार हेमंत पवार यांची नियुक्ती करण्यात आली असून, त्यांनी गोंडपिपरी पोलीस ठाण्याची सूत्रे स्वीकारली.ग्रामीण भागातील नागरिकांच्या तक्रारींची तत्परतेणे दखल, गुन्हेगारीवर नियंत्रण, वाहतूक व्यवस्था सुरळीत ठेवणे आणि पोलीस-नागरिकांमधील समन्वय वाढविणे या बाबींवर नवनियुक्त ठाणेदारांची कार्यपद्धती कशी राहणार, याकडे आता तालुकावासीयांचे लक्ष लागले आहे. ठाणेदार रमेश हत्तीगोटे यांच्या कार्यकाळात तालुक्यातील कायदा व सुव्यवस्था राखण्यासोबतच नागरिकांच्या तक्रारींकडे गांभीर्याने लक्ष देण्यात आले. विविध गुन्हे व प्रकरणांमध्ये शिस्तबद्ध पद्धतीने काम करत त्यांनी जुगार, सट्टा, गोवंश तस्करी, गांजा विक्री तसेच इतर अवैध धंद्यांवर कारवाई करण्यासाठी प्रयत्न केले. त्यांच्या कार्यकाळातील कामगिरीबद्दल पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांनी त्यांना निरोप दिला. दरम्यान, नवनियुक्त ठाणेदार हेमंत पवार यांच्यासमोर गोंडपिपरी तालुक्यातील कायदा व सुव्यवस्था अधिक प्रभावीपणे राखण्याचे आव्हान आहे. विशेषतः अवैध दारूविक्री, जुगार, सट्टा, गोवंश तस्करी, अमली पदार्थांची विक्री आणि इतर अवैध धंद्यांवर आळा घालण्यासाठी ठोस कारवाई करण्याची अपेक्षा नागरिकांकडून व्यक्त होत आहे. ग्रामीण भागातील नागरिकांच्या तक्रारींची तत्पर दखल घेणे, गुन्हेगारीवर नियंत्रण ठेवणे, वाहतूक व्यवस्था सुरळीत करणे तसेच पोलीस आणि नागरिकांमधील समन्वय अधिक बळकट करणे, या बाबींवर नवनियुक्त ठाणेदार हेमंत पवार यांची कार्यपद्धती कशी राहणार, याकडे आता तालुकावासीयांचे लक्ष लागले आहे.